# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.12.2025** **वार- मंगळवार**

---

**प्रादेशिक**

राज्यातल्या सर्व 243 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी येत्या 21 डिसेंबरला करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहेत. सुरवातीच्या कार्यक्रमानुसार या सर्व जागांसाठी आज मतदान होणार होतं, मात्र न्यायालयीन अपील झालेल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये 20 डिसेंबरला मतदान घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. यामध्ये 24 नगराध्यक्ष आणि 204 सदस्यांच्या जागांचा समावेश आहे. त्यामुळे आज एकंदर 264 नगरपरिषदा आणि नगरपंचायती जागांसाठी मतदान होत आहे.

सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत, अन्यथा 20 नगरपरिषदांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठासमोर दाखल करण्यात आली होती. त्यावर आज झालेल्या सुनावणीत न्यायालयाने सर्व निकाल एकत्र 21 डिसेंबरला जाहीर करण्याचे आदेश दिले. तसंच या निवडणुकीचे एक्झिट पोलही 20 डिसेंबरला निवडणूक संपल्यानंतर अर्ध्या तासानं जाहीर करता येतील, आणि नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीची आदर्श आचारसंहिताही 20 डिसेंबरपर्यंत लागू राहील, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं.

**मतदान**

राज्यातील 264 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान झालं. पुणे जिल्ह्यात दुपारी साडेतीन वाजेपर्यंत सरासरी 51 टक्के मतदान झालं. मंचर मध्ये 61 टक्क्यांहून जास्त मतदान झालं आहे.

**EVM**

पुण्यातील भोर नगरपरिषद इथल्या मतदान केंद्रावर काही नागरिकांनी EVM मशीनची पूजा केल्याचे समोर आलं आहे. ही कृती निवडणूक आयोगाच्या नियमांचं उल्लंघन करणारी असून EVM ची पूजा करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया त्वरित सुरू करण्यात आली आहे. नियमांचं उल्लंघन झाल्यामुळे, आयोगानं या मतदान केंद्रावर नवीन केंद्रप्रमुखांची नियुक्ती केली.

**मुदतवाढ**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत येत्या 22 फेब्रुवारीला घेण्यात येणाऱ्या पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्तीपरीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी 8 डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानंतर 31 डिसेंबरपर्यंत विलंब शुल्कासह अर्ज भरता येतील.

**रब्बी पीकविमा**

तांत्रिक समस्यांमुळे पीक विम्याला विलंब होऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी मुदत संपण्यापूर्वीच पीक विमा उतरवण्याचं आवाहन कृषी विभागानं केलं आहे. शेतकऱ्यांना 'आपले सरकार' केंद्रावर योजनेसाठी अर्ज करता येणार असून, अर्ज प्रक्रियेतील अडचणींसाठी 14447 या हेल्पलाईन क्रमांकावर किंवा राज्य कृषी विभागाच्या krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संपर्क करण्याचं आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आलं आहे.

**व्हर्च्युअल वॉक थ्रू**

पुण्यातील एक महत्त्वाचं वारसा स्थळ असलेल्या पाताळेश्वर लेण्याच्या व्हर्च्युअल वॉक थ्रू प्रकल्पाचं उद्घाटन नुकतंच जागतिक वारसा सप्ताहाच्या निमित्तानं करण्यात आलं. या प्रकल्पाच्या माध्यमातून पाताळेश्वर लेण्याची माहितीपूर्ण सफर आता घरबसल्या करता येणार आहे. वारसा स्थळांमध्ये दडलेला गौरवशाली इतिहास सर्वदूर पोहोचावा, या संकल्पनेतून हा प्रकल्प तयार झाला आहे. अशी माहिती भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे. मुंबई मंडळाचे अधीक्षक. डॉक्टर अभिजीत आंबेकर यांनी आकाशवाणीला दिली.

**पवना-प्रदूषण**

पवना नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका पर्यावरण विभागाकडून व्यापक सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या अनुषंगानं केजुदेवी बंधारा, थेरगाव इथं नदीच्या पाण्यावर फेस दिसून आल्यानंतर त्वरित ताथवडे, पुनावळे, वाल्हेकरवाडी आणि रावेत परिसरात उपद्रव शोध पथकांमार्फत सखोल तपासणी सुरू करण्यात आली आहे. या सर्वेक्षणात नदीप्रदूषणास कारणीभूत असलेल्या अनधिकृत आणि नियमबाह्यरित्या चालणाऱ्या लघुउद्योग आणि आस्थापनांची माहिती गोळा केली जात असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

**मॅरथॉन**

येत्या रविवारी पुण्यात 39 वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत 15 हजार खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून नोंदणी कालपासून बंद करण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये केनिया, दक्षिण आफ्रिका, नेपाळ, श्रीलंका या देशातील सुमारे 70 धावपटू सहभागी होत आहेत. गतविजेती भारतीय खेळाडू ज्योती गवते तसेच दुसऱ्या क्रमांकाचा विजेता केनियाचा सायमन त्याचप्रमाणे रेल्वे, पोलीस, आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट, एन डी ए, एस आर पी एफ मधील अव्वल दर्जाचे धावपटू स्पर्धेत सहभागी होत आहेत. ही स्पर्धा 42 किलोमीटर, 21 किलोमीटर, दहा, पाच किलोमीटर आणि व्हील चेअर गटात होणार आहे. स्पर्धेला पहाटे तीन वाजता सणस मैदानापासून हिरवा कंदील दाखवण्यात येईल. यंदा स्पर्धेचा मार्ग बदलला असून जंगली महाराज रस्ता, कर्वे रोड, राजाराम पुल, सिंहगड रस्ता मार्गे पुन्हा सणस मैदानावर समारोप होईल.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 11 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं, उद्याही साधारणपणे असंच तापमान राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**